आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता
१ जून २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- नाशिकमधे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनासंदर्भात मुख्यमंत्र्यांची आढावा बैठक, तयारीसाठी ४ हजार कोटी रुपयांच्या निविदा काढल्याची दिली माहिती, ३१ ऑक्टोबर २०२६ ला होणार सिंहस्थाला प्रारंभ

- देशाच्या वस्तू आणि सेवा कर संकलनाने मे महिन्यातही ओलांडला दोन लाख कोटी रुपयांचा टप्पा

- रशियाच्या ४० लष्करी विमानांना लक्ष्य करत युक्रेनचा मोठा ड्रोन हल्ला

- ईशान्येकडच्या राज्यांमधे मुसळधार पाऊस, रस्ते आणि रेल्वे वाहतूक विस्कळीत

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थान मिळवण्याकरता आज मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात दुसरा पात्रता सामना

**<><><><>**

त्र्यंबकेश्वर आणि नाशिकमधल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजना संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नाशिक इथं १३ प्रमुख आखाड्यांचे महंत, साधुसंत, सर्व प्रमुख पुरोहीत संघाचे प्रतिनिधी यांच्यासोबत आढावा बैठक घेतली. कुंभमेळ्याच्या आयोजनाच्या दृष्टीनं करायच्या कामांसाठी ४ हजार कोटी रुपयांच्या निविदा काढल्या आहेत, तसंच आणखी २ हजार कोटी रुपयांच्या निविदा काढणार असल्याचं त्यांनी या बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

यंदाचा कुंभमेळा दीर्घकाळ चालणार असून, एकाच तारखेला गर्दी, किंवा गर्दीमुळे कोणती दुर्घटना होणार नाही अशाप्रकारे नियोजन केलं जाईल, असं ते म्हणाले.

३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी सिंहस्थाला प्रारंभ होईल असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या कुंभमेळ्या दरम्यान नाशिक आणि त्र्यंबकेश्वर या दोन्ही ठिकाणी पहिलं अमृतस्नान २ ऑगस्ट २०२७ला आणि दुसरं अमृतस्नान ३१

ऑगस्ट २०२७ ला होणार आहे. नाशिकमधलं तिसरं स्नान ११ सप्टेंबर २०२७ला होणार आहे, तर त्र्यंबकेश्वर मधलं तिसरं अमृत स्थान १२ सप्टेंबर २०२७ला होणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

<><><>

देशाच्या जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर संकलनाने मे महिन्यातही दोन लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. या महिन्यात एकूण २ कोटी एक लाख इतकं वस्तू आणि सेवा कर संकलन झालं अशी माहिती केंद्रीय अर्थ मंत्रालयानं दिली आहे. एप्रिल महिन्यात जीएसटी संकलन २ कोटी ३७ लाख रुपये होतं. आयात मालावरील जीएसटी संकलन ५१ हजार २६६ कोटी आहे, तर देशांतर्गत मालावरील जीएसटी संकलन दीड लाख कोटी आहे.

<><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आशियाई विकास बँकेचे अध्यक्ष मसातो कांडा यांची नवी दिल्ली इथे भेट घेतली. या भेटीविषयी समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये प्रधानमंत्री म्हणाले की, गेल्या दशकात भारताच्या जलद परिवर्तनामुळे असंख्य लोक सक्षम झाले असून या प्रगतीचा वेग वाढवण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्नशील आहोत, असं मोदी म्हणाले.

या बैठकीदरम्यान विविध मुद्द्यांवर चर्चा झाल्या. पुढच्या पाच वर्षांत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी, मेट्रो सेवेचं जाळं विस्तारण्यासाठी, शहरातल्या सुविधांचं आधुनिकीकरण करण्यासाठी आशियाई विकास बँक १० अब्ज डॉलर्सच्या निधीची तरतूद करेल, असं अध्यक्ष मसातो कांडा यावेळी म्हणाले.

<><><>

२०२६ च्या विधानसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमधे भारतीय जनता पक्षाचं सरकार स्थापन होईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला आहे. ते कोलकाता इथं आयोजित सभेला संबोधित करत होते. तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्त्वाखालच्या राज्य सरकारवर शहा यांनी यावेळी जोरदार टीका केली. या सरकारच्या काळात भ्रष्टाचार, हिंसाचार वाढला असून महिला असुरक्षित असल्याचं ते म्हणाले. सभेआधी त्यांनी कोलकाता इथं सेंट्रल फॉरेन्सिक सायन्स लॅबोरटरीचं उद्घाटन केलं.

<><><><>

महाराष्ट्रासह देशाच्या इतिहासात चित्पावन ब्राह्मण समाजातल्या नामवंतांनी प्रत्येक क्षेत्रात महत्वाचं योगदान दिलं असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिक इथं परशुराम भवन या वास्तूच्या लोकार्पण सोहळ्यात बोलत होते. चित्पावन ब्राह्मण संघाला सहकार्य करण्याचं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं.

<><><><>

युक्रेननं आज मोठा ड्रोन हल्ला करत रशियाच्या ४० लष्करी विमानांना लक्ष्य केलं. या हल्ल्यात नष्ट झालेल्या रशियाच्या हवाईदलाच्या विमानांमध्ये युक्रेनवर लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांचा मारा करण्यासाठी रशिया वापरत असलेल्या टी यु ९५ आणि टी यु २२ या विमानांचा समावेश असल्याचं युक्रेनचं म्हणणं आहे. रशियाच्या सीमेपासून हजारो किलोमीटर अंतरावर असलेल्या पूर्व सैबेरियातल्या एका तळावर हल्ला करून, युक्रेननं रशियावर आतापर्यंचा हा सर्वात मोठा ड्रोन हल्ला केला.

<><><><>

ईशान्य भारतातल्या सर्व राज्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. जोरदार पावसानं या संपूर्ण प्रदेशातली रस्ते आणि रेल्वे वाहतूक सेवा बाधित झाली आहे. या पावसामुळं झालेल्या विविध दुर्घटनांमध्ये आत्तापर्यंत २७ जणांचा मृत्यू झाला असल्याचं स्थानिक अधिकाऱ्यांनी कळवलं आहे. दरम्यान पुढच्या पाच दिवसांत ईशान्य भारतात जोरदार पाऊस होईल असा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला असून, स्थानिक प्रशासनानं नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

केरळ, पुद्दुच्चेरी आणि कर्नाटकमध्ये बुधवारपर्यंत मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होईल, तर जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरयाणा, चंदीगड आणि दिल्ली इथंही बुधवारपर्यंत अशीच परिस्थिती असेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आसाम, मणिपूर, सिक्किम आणि अरुणाचल प्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क करून तिथे झालेल्या अतिवृष्टी आणि भूस्खलनामुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. तसंच केंद्र सरकारकडून पूर्ण सहकार्याची हमी दिली.

**<><><><>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत, तिसऱ्या फेरीत पराभूत झाल्यामुळे भारताच्या युकी भांबरी आणि रोहन बोपण्णा यांना त्यांच्या जोडीदारांसह  पुरुष दुहेरीतून बाहेर पडावं लागलं आहे.

तिसऱ्या फेरीत आज युकी भांबरी आणि त्याचा अमेरिकी जोडिदार रॉबर्ट गॅलोवे यांना इव्हानकी आणि ख्रिस्टीयन हॅरीसन या अमेरिकी जोडिनं ४-६, ४-६ असं पराभूत केलं.
तर, रोहन बोपण्णा आणि त्याचा चेक जोडीदार ॲडम पावलासेक यांचा हेन्री पॅटन आणि हॅरी हेलिओवारा या ब्रिटिश-फ्रेंच जोडीने त्यांचा पराभव केला.

**<><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थान मिळवण्याकरता आज अहमदाबाद इथं मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज्स यांच्यात दुसरा पात्रता सामना होत आहे.

पंजाब किंग्ज्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. मात्र पावसामुळे मैदान ओलं असल्यानं खेळ सुरु व्हायला विलंब झाला आहे.
स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आजच्या सामन्यातला विजेता संघ आणि बंगळुरू यांच्यात येत्या ३ जूनला अहमदाबाद इथं अंतिम लढत होईल.

**<><><><>**

भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्तानं संरक्षण मंत्रालय आणि माय जी.ओ.व्ही. इंडिया या संकेतस्थळानं संयुक्तपणे देशभरातल्या युवा वर्गासाठी विविध स्पर्धांचं आयोजन केलं आहे. आजपासून या स्पर्धेला सुरुवात झाली.

याअंतर्गत ऑपरेशन सिंदूर - दहशतवादाविरोधातल्या भारताच्या धोरणाची नवी परिभाषा या विषयावरच्या निबंध स्पर्धंच आयोजन केलं आहे. समाजमाध्यमांवरच्या इन्फ्लुएन्सरसाठी, भारताच्या स्वातंत्र्याशी संबंधित कोणत्याही ठिकाणाला भेट देऊन, त्यासंबंधीचे  व्हिडिओ आणि रील्स बनवण्याची स्पर्धाही आयोजित केली आहे. याअंतर्गत स्पर्धकांना न्यू इंडिया, एम्पॉवर इंडिया आणि इंडिपेंडन्स ट्वेंटी ट्वेंटी फाईव्ह हे हॅशटॅग वापरून आपले रील्स आणि व्हिडिओ समाजमाध्यमांवर पोस्ट करता येतील. या दोन्ही स्पर्धांमधल्या पहिल्या तीन विजेत्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचं पारितोषिक दिलं जाईल.

याबरोबरच नया भारत सशक्त भारत या संकल्पनेवरच्या चित्रकला स्पर्धेचंही आयोजन केलं आहे. याअंतर्गत स्पर्धकांना चित्रकलेच्या माध्यमातून देशाची प्रगती आणि यशाचं दर्शन घडवण्याची संधी असेल. या स्पर्धांबद्दलची अधिक माहिती माय जी.ओ.व्ही. या संकेतस्थळावर दिली आहे. या स्पर्धा सर्वांसाठी खुल्या असून, स्पर्धकांना येत्या ३० तारखेपर्यंत नोंदणी करता येणार आहे.

<><><><>

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मेरठच्या जंगेठी गावात विकासित कृषी संकल्प अभियानांतर्गत आज शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली.

विकसित कृषी संकल्प अभियानाबाबत माहिती देताना ते म्हणाले की, या मोहिमेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नव्या कृषी संशोधनाशी थेट जोडलं जाणार असून, यामुळे शेती उत्पादन आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ व्हायला मदत होणार आहे.

<><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नागालँड विधानसभेचे सर्व सातही आमदार सत्ताधारी पक्ष डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पक्षामध्ये सामील झाले आहेत. त्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या आमदारांची संख्या ३२ झाली आहे. संसदीय कामकाज मंत्री आणि एनडीपीपी पक्षाचे वरिष्ठ नेते केजी केन्ये यांनी काल वार्ताहरांना ही माहिती दिली. या आमदारांनी विलीनीकरणाचा अर्ज विधानसभा अध्यक्षांकडे सादर केल्याचं केन्ये यांनी सांगितलं.

<><><><>

बदललेल्या वातावरणामुळं मान्सूनचा प्रवास सध्या रखडलेला असून, १० जूनपर्यंत राज्यात पावसाचं प्रमाण कमीच राहाणार आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून पेरणीची घाई करू नये, असा सल्ला कृषी विभागानं विशेषतः कोरडवाहू शेतकऱ्यांना दिला आहे. किमान १० जूनपर्यंत राज्यात बहुतांश भागात  हवामान कोरडं राहणार आहे. यामुळे तापमानात वाढ होणार असून, विदर्भात तापमान ४० अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

//<><><><>//